•बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२६ • मंगळवार,दि.२७ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रुपये
•Beed (Maharashtra) •Year 3 • Issue 326 • Tuesday 27 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# राज्यात सर्वात मोठ्या शिक्षक भरतीचा पहिला टप्पा पूर्णत्वास

**मुंबई । वृत्तसेवा**

**राज्यात गेल्या वीस वर्षातील सर्वात मोठ्या शिक्षक भरतीचा पहिला टप्पा काल रात्री पूर्ण करण्यात आला आहे व जवळपास ११ हजार नवीन शिक्षकांची भर शाळांमध्ये पडत आहे. पूर्णपणे पारदर्शक व कोणत्याही प्रभावाखाली न येता ही प्रक्रिया पूर्ण केली गेली. संपूर्ण प्रक्रिया सुरू असताना समाज माध्यमांवर उपस्थित झालेल्या प्रत्येक प्रश्नाला प्रशासनाने उत्तर दिले तर अभियोग्यताधारकांच्या व्यक्तिगत संदेशांना सुद्धा उत्तर दिले.**



अधिकृत न्यूज बुलेटीन पोर्टलवर दररोज प्रसारित करण्यात आल्याची माहिती शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिली. ते म्हणाले की, या संपूर्ण प्रक्रियेत गैरप्रकार करण्यास कोणासही संधी मिळू नये यासाठी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यांचे फोन रेकॉर्ड करावेत, फोटो ठेवावेत व अशांविरुद्ध थेट पोलीस तक्रार करावी असे खुले आवाहन केले होते. अभियोग्यताधारकांना संभ्रमित करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी अनेकविध उपाय योजना केल्या गेल्या. या प्रक्रियेदरम्यान जेव्हा जेव्हा काही प्रश्न अथवा तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या त्याचे मंत्रालय स्तरावरून मंत्री शिक्षण व प्रधान सचिव यांनी अत्यंत तातडीने व प्रगल्भतेने निराकरण केल्यामुळे प्रक्रिया पुढे नेणे सुकर झाले. या सर्वांच्या परिणाम स्वरूप आज निवड न झालेल्या उमेदवारांमध्ये देखील भरती प्रक्रिया अत्यंत निष्पक्ष पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पूर्ण झाल्याची भावना आहे व ती तशी त्यांनी बोलून दाखवली आहे. या उपरही कोणाच्या काही शंका असल्यास त्याचे अधिकृतरित्या निरसन करण्यासाठी पहिल्यांदाच तक्रार निवारण व दुरुस्ती समितीची रचना करण्यात आली आहे. ती सुविधा इमेल द्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. एकंदरीत इतक्या उचित पद्धतीने निवड झालेले सर्व नवीन शिक्षक, विद्यार्थी घडवण्याच्या कामात त्यांचे पूर्ण योगदान देतील अशी अपेक्षा आहे.

## मराठवाड्यात दुष्काळाची दाहकता अती तीव्र

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यासह मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणार आहे. मार्च महिना उजडला नाही तोच उन्हाच्या झळा जाणवू लागल्या. पाऊस कमी पडल्यामुळे विहिरींनी तळ गाढला अनेकांचे बोअर आटले. त्यामुळे पाण्यासाठी लोकांना वन-वन भटकंती करावी लागू लागली. केज, धारूर आणि लातुर या तीन ठिकाणी पाणी पुरवठा करणार्या मांजरा धरणातही यंदा फक्त १२ टक्के पाण्याचा साठा शिल्लक राहिला. बीड न.प.ला पाणी पुरवठा होत असलेल्या माजलगावच्या धरणात तर २ टक्के पाणी शिल्लक राहिले. जिल्ह्यातील एकुण धरणात फक्त १३ टक्के पाण्याचा साठा असल्याने आगामी काळात पाण्याचा प्रश्नअतिगंभीर होणार असल्याचे दिसुन येत आहे. मराठवाड्यामध्ये दुष्काळ असल्याने पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होवू लागली.



फेब्रुवारी महिन्यामध्ये बहुतांश ठिकाणी टँकरची मागणी झाली आहे. काही ठिकाणी टँकर सुरू करण्यात आले. ज्या विहिरींना आणि बोअरला चांगले पाणी आहे त्या विहिरी अधिग्रहीत करण्याचा विचार शासन करत आहे. बीड जिल्ह्यात एकुण १४३ लहान मोठे धरणे आहेत. त्यात १६ मध्यम व १२६ लघु प्रकल्प आहेत. ४ प्रकल्पात ७५ टक्केयापेक्षा जास्त पाण्याचा साठा आहे. मांजरा धरणावर धारूर, केज आणि लातुर हे शहर अवलंबून आहेत. या धरणातून या तिन्ही नगर पालिकेसह १२ गावच्या ग्रां.पं ना पाणी पुरवठा केला जात आहे. मात्र या धरणात फक्त १२ टक्के पाण्याचा साठा शिल्लक राहिलेला आहे. माजलगाव धरणातून बीड न.प.ला पाणी पुरवठा होत आहे. या धरणात फक्त २ टक्के पाणी साठा शिल्लक राहिला. पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावू लागली. पाणी पुरवठ्या बाबत शासनाला गांभीर्याने घ्यावे लागणार आहे. तीन वर्षापुर्वी अशाच दुष्काळाला सामोरे जाण्याची वेळ मराठवाड्यावर आली होती. मार्च महिन्यापासुन उन्हाची तिव्रता वाढणार असल्याने ठिक ठिकाणी पाणी पुरवठा करण्याची वेळ जिल्हा प्रशासनावर येणार आहे.

## परभणी लोकसभा निवडणुकीत ठाकरे गट वरचढ ?

**परभणी । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीची अधिकृत घोषणा झाली नसली तरी महिनाभरात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी लोकसभा निवडणुकीसाठी प्रत्येक मतदारसंघात जोर लावला आहे. सत्ताधारी महायुती आणि विरोधक महाविकास आघाडीकडून अजून उमेदवारांची घोषणा झाली नसली सर्वांची उत्कंठा वाढली आहे. आधी शिवसेनेत पडलेली फूट त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट यामुळे राज्यातील राजकीय समिकरणे बदलली आहेत. त्यामुळे परभणी मतदारसंघ पहिल्यांदा भाजपकडे आला असला तरी उमेदवार न ठरल्याने मतदारांचीही उत्कंठा वाढली आहे.

## जिल्हा रुग्णालयात कोनशीलीचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आयुष्यमान भारत इन्फ्रास्ट्रक्चर मिशन योजनेअंतर्गत जिल्हा रुग्णालय बीड येथे ५० खाटांची नवीन बांधकामाची मंजुरी प्राप्त झाली असून त्याचे कोनशीला उद्धाटन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संपन्न झाले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक अशोक बडे, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, जिल्हा परिषद ग्रामीण विकासच्या प्रकल्प अधिकारी संगीता देवी



पाटील, पुणे येथील नोडल अधिकारी श्री. जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी श्री कासट, श्री तांदळे, कार्यकारी अभियंता नितीन खाडे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे या विषयाची माहिती दिली. सुसज्ज असे ५० खाटांचे क्रिटिकल केअर हॉस्पिटल रुग्णांसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे या वेळी सांगितले.

## सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील जनतेच्या विश्वासाला अपात्र ठरलेल्या या सरकारच्या आशीर्वादाने राजकारणाचे गुन्हेगारीकरण सुरू आहे. शेतकऱ्यांची या सरकारने घोर फसवणूक केली असून, विदर्भ, मराठवाड्यावर अन्याय केला आहे. महायुती सरकारच्या काळात सामाजिक तेढ वाढली असून सर्व पातळ्यांवर अपयशी ठरल्याचा आरोप विरोधकांनी करत, सरकारच्या चहापानावर बहिष्कार घातला. या सरकारच्या काळात राजकारणातील गुन्हेगारी वाढली आहे. गोळीबाराच्या घटनांत वाढ झाली असून पोलीस ठाण्यात सत्ताधारी भाजपचे आमदार गोळीबार करू लागले आहेत. प्रक्षोभक विधान करून काही



लोकप्रतिनिधी राजकीय वातवरण गढूळ करीत आहेत अशी टीका विरोधकांनी केली. गुंडांना पोसण्याचे काम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सरकार करीत आहे. अशा शब्दांत विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर टीका केली. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधी नेत्यांच्या बैठकीला यांच्यासह विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते दानवे, विधिमंडळ काँग्रेसचे गटनेते थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते देशमुख, शिवसेनेचे प्रभू, समाजवादी पक्षाचे शेकापचे जयंत पाटील, आमदार जगताप आदी उपस्थित होते. शेतकऱ्यांची घोर फसवणूक सुरू आहे. कांद्यावरील निर्यात बंदी उठवल्याची माहिती राज्यातील राज्यकर्त्यांकडून दिली जाते. पण केंद्राने बंदी कायम असल्याचे जाहीर केले. यात कांदा उत्पादक शेतकरी भरडले गेले. सरकारने मराठा समाजाची पुन्हा फसवणूक केली आहे असा आरोप यांनी केला. चहापानावर बहिष्कार टाकण्याची विरोधकांची परंपरा कायम असून ते निराश व गोंधळलेले असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. केंद्र व राज्य सरकार चांगल्या प्रकारे जनतेसाठी निर्णय घेत असून विकासकामे होत आहेत, ही विरोधकांची खरी पोटदुखी असल्याची टिप्पणीही त्यांनी केली. विरोधकांना जनतेच्या प्रश्नांशी देणेघेणे नसून राजकारण करायचे आहे. दुष्काळ, वादळ, अतिवृष्टी अशा विविध संकटांचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने गेल्या दीड वर्षात सुमारे ४५ हजार कोटी रुपयांची मदत दिली आहे. केंद्र सरकारप्रमाणेच राज्य सरकारही प्रतिवर्षी सहा हजार रुपये शेतकऱ्यांना देत असून एक रुपयात पीकविमा योजना सुरू आहे. त्याचा हप्ता सरकार भरीत आहे असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## परिचारिकेने जिव धोक्यात घालून वाचवले चिमुकल्याचा प्राण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वारातीच्या पाच सहा परिचारिका मिळून कार्यालयासमोर असणाऱ्या महादेव मंदिरामध्ये दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी भक्तासाठी ठेवलेल्या बाकड्यावर एक चिमुकला खेळत होता.तो बाकडा त्याच्या अंगावर पडला.तो बाकडा उचल्यामुळे प्रतिक कांबळे या ७ वर्षे वयाच्या मुलाचा जीव वाचवला पण तो बाकडा परिचारिका कविता फड यांच्या पायावर पडून पायाचा चुराडा झाला. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयच्या अधिपरिचारीका कार्यालयासमोर महादेव मंदिर आहे. त्या मंदीरात दर्शनासाठी स्वारातीचे कर्मचारी महिला तर परिसरातील चिमुकले हे खेळण्या बागडण्यासाठी येत आसतात. मंदीर परिसरात भाविकांना बसण्यासाठी सिमेंट बाकडे बसवलेले आहेत. त्या बाकड्यावर महिला, वयवृध्द बसतात तर बाकड्यावर चिमुकले खेळत बागड आसतात. आसच त्या सिमेंट बाकड्यावर ७ वर्षाच्या वयाचा चिमुकला प्रतिक कांबळे हा खेळण्यात व्यस्त होतात्याचवेळी त्याच्या अंगावर सिमेंटचे २०० किलोचे



बाकडे त्याच्या अंगावर पडले.त्याच्या अंगावर पडले त्यावेळी त्याने जोरात आई म्हणून हाक मारली त्या जवळच असलेले परिचारीका सौ.कविता फड, सौ .उषा राठोड,राणी मुंडे,मंदाकिनी भोपळे,स्वाती मुखेडकर, दैवशाला ठाकूर या मंदीरात दर्शनाला आल्या होत्या. प्रतिक कांबळे या चिमुकल्याच्या हाक त्या जवळ असलेल्या परिचारीकांच्या कानी पडताच मनात ममत्व जागे झाले. क्षणाचा ही विलंब न करता त्या धावत मुलाकडे येऊन त्याच्या अंगावरचा बाकडा बाजुला सारून त्याला जिवदान दिले खरे पण तो सिमेंटचे बाकडा परिचारीका कविता फड यांच्या पायावर पडल्याने पायाचा चुराडा झाला. त्यांच्यावर स्वारातीमध्ये उपचार सुरु आहेत. माझा कायमस्वरूपी पाय आदु झाला याची खंत मनात असली तरी एका चिमुकल्याचा जिव वाचला याचा आनंद आसल्याची भावना कविता फड यांनी व्यक्त केली आहे. फड व सहकारी परिचारिकेत एक आई जागी झाल्यामुळे मुलाचा जिव वाचल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत असुन स्वाराती अधिसेवीका कार्यालयाच्या वतीने कविता फड यांच्या कार्याचे कौतुक करुन सन्मान केला.

# शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट रद्द करणार –मंत्री केसरकर

**नगर । वृत्तसेवा**

राज्यभरातील प्राथमिक शिक्षक प्रामाणिकपणे काम करत असून मुख्यालयी राहण्याची अट कायमस्वरूपी रद्द केली जाईल, तसे आदेश देणे बाबतची कार्यवाही तातडीने केली, असे आश्वासन नगरमधील महाराष्ट्र राष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या अधिवेशनात ऑनलाइन संबोधत करताना राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिले. अध्यक्षस्थानी महासंघाचे राज्य नेते संभाजीराव थोरात होते. नगरमधील कल्याण रोडवरील मंगल कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात जिल्हाभरातून आलेल्या शिक्षकांच्या भरगच्च उपस्थितीत मंत्री केसरकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. संभाजी तात्यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक शिक्षक संघ राज्यात सक्षमपणे काम करत असून संघाच्या व्यासपीठावरील प्रश्न तातडीने निकाली काढले जातील, असेही ते म्हणाले . यावेळी पुढे बोलताना केसरकर यांनी एमएससीआयटी परीक्षेबाबतीचा ही सकारात्मक निर्णय घेतला जाणार आहे असे म्हटले व प्राथमिक शिक्षकांना १०–२०–३० ही आश्वासित प्रगती योजना ही तातडीने अंमलात आणली जाईल, असेही आश्वस्त केले. यावेळी खासदार सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, डॉ. सुधीर तांबे, राज्याचे नेते संभाजी थोरात, राष्ट्रीय सरचिटणीस बाळासाहेब झावरे, माजी संचालक दिनकर टेमकर, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील आदीसह महिला आघाडीच्या नेत्या जयश्री झरेकर, संगीता कुरकुटे, स्वाती झावरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी खासदार सुजय विखे यांनी प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांबाबत स्वतः लक्ष घालून मुख्यमंत्र्यांशी बोलून मार्ग काढला जाईल, असे सांगितले. आमदार संग्राम जगताप यांनीही मी आपल्या सोबत असल्याचे आश्वासन दिले. शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले यांनीही आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतातून आमदार प्रशांत बंब यांचा बंदोबस्त सरकारने करण्याची आग्रही मागणी केली. शिक्षकांना जाणीवपूर्वक त्रास दिला जातोय! डॉ. संजय कळमकर यांनी माहिती अधिकारात काहीजण मुख्यालयाच्या प्रश्नावरून शिक्षकांना जाणीवपूर्वक अडचणीत आणत असल्याने मुख्यालयाची अट रद्द करण्याची मागणी केली. राज्य सरचिटणीस आबासाहेब जगताप यांनी पाहुण्यांचे स्वागत करून डॉ. कळमकर व रावसाहेब रोहोकले सोबत आल्याने संघ बलाढय झाला असून, यापुढे जिल्ह्यातील व राज्यातील प्राथमिक शिक्षकांना आपले प्रश्न सोडवण्यासाठी प्राथमिक शिक्षक संघ हे हक्काचे व्यासपीठ असल्याचे म्हटले. डॉ.कळमकर राज्य संपर्क पदी; रोहोकले उपनेते संजय कळमकर यांची संघाच्या राज्य संपर्क पदी व रावसाहेब रोहोकले यांची उपनेतेपदी निवड करीत असल्याची घोषणा संभाजीराव थोरात यांनी करताच सभागृहात टाळ्यांच्या गजरात त्याला अनुमोदन देण्यात आले. मुख्यालयाची अट रद्द करणे किंवा तिला स्थगिती देणे, एमएससीआयटी परीक्षा विहित काळात न दिल्याने होणारी कपात थांबवणे व झालेली कपात शिक्षकांना पुन्हा मिळवून देणे, जिल्हातर्गत शिक्षक बदली प्रक्रिया राबवणे अशा अनेक प्रश्नांवर त्वरित बैठक पार लावून आदेश निर्गमीत करू, असे शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी सांगितल्याचे राज्यनेते संभाजीतात्या थोरात यांनी सांगितले.

# बनावट नोटांची छपाई

**पिंपरी । वृत्तसेवा**

चीनमधून ऑनलाइनव्दारे कागद मागवून त्यावर भारतीय चलनातील बनावट नोटा छापल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला. पुण्यातील अप्पा बळवंत चौकातून छपाईसाठी जुने ऑफसेट मशिन आणून दिघी येथील मॅगझिन चौकात बनावट नोटा छापण्याचा हा उद्योग सुरू करण्यात आला होता. देहूरोड पोलिसांनी या 'स्कॅम'चा पर्दाफाश केला. याप्रकरणी मास्टरमाइंडसह सहा जणांना अटक केली. त्यांच्याकडून ७० हजार रुपये किंमतीच्या बनावट नोटा जप्त केल्या. किवळे येथील मुकाई चौकात रविवारी (दि. २५) ही कारवाई केली. ऋतिक चंद्रमणी खडसे (२२, रा. विठ्ठलवाडी, देहुगाव, मूळ रा. मंगरुळपीर, जि. वाशिम), सुरज श्रीराम यादव (४१, रा. चऱ्होली), आकाश विराज धंगेकर (२२, रा. आकुर्डी, मूळ रा. अंबेजोगाइ, ता. जि. धाराशिव), सुयोग दिनकर साळुंखे (३३, रा. आकुर्डी, मूळ रा. दुधवंडी, ता. पलूस, जि. सांगली), तेजस सुकदेव बल्लाळ (१९, रा. अरणगाव, ता. भूम, जि. धाराशिव), प्रणव सुनील गव्हाणे (३०, रा. आळंदी रस्ता, भोसरी ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्यांना न्यायालयाने सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. याप्रकरणी पोलिस अमंलदार किशोर परदेशी यांनी देहूरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऋतिक खडसे हा माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील पदविका (डिप्लोमा) धारक आहे. तसेच सुरज यादव हा वाहन चालक आहे. छपाइचा व्यवसाय सुरू करण्यासाठी ऋतिक, सुरज आणि त्यांचे इतर साथीदार एकत्र आले. त्यासाठी दिघी येथील मॅगझीन चौक परिसरात एक गाळा भाडेतत्त्वावर घेतला. पुण्यातील अप्पा बळवंत चौकातून छपाईचे एक जुने ऑफसेट मशिन आणले. त्यावर पत्रके तसेच इतर छपाईची कामे करण्याची त्यांनी तयारी केली. मात्र, त्यांना छपाईची कामे मिळाली नाहीत. त्यामुळे गाळ्याचे भाडे आणि इतर खर्च वाढला. त्यातून आर्थिक बोजा पडत असल्याने काही तरी वेगळे करण्याचे त्यांनी ठरवले. ''मला नोटांचे डिजाइन करता येते. चलनी नोटा छापल्यास आपल्याला मोठा फायदा होईल'', अशी कल्पना सुरज याला सुचली. त्यानुसार त्यांनी चीन येथून ऑनलाइनव्दारे तेजस बल्लाळ याच्या पत्त्यावर कागद मागवला. त्यानंतर पहिल्या टप्प्यात ७० हजार रुपये किमतीच्या ५०० रुपयांच्या चलनी नोटांची छपाई केली. या नोटा देण्यासाठी एका व्यक्तीशी संपर्क साधला. एक लाखाच्या बनावट नोटांच्या बदल्यात ४० हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानुसार ऋतिक हा ७० हजार रुपये किमतीच्या बनावट नोटा घेऊन किवळे येथील मुकाई चौकात आला. याबाबत देहूरोड पोलिसांना माहिती मिळाली. त्यानुसार सहायक पोलिस आयुक्त देवीदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक नितीन फटांगरे यांच्या पथकाने ऋतिक याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून बनावट नोटा जप्त केल्या. तसेच त्याच्यासह त्याच्या साथीदारांना अटक केली. पहिल्या टप्प्यात दोन लाख रुपये किमतीच्या बनावट नोटा छापता येतील इतका कागद चीन येथून मागवण्यात आला. त्यातील ७० हजार रुपये किमतीच्या बनावट नोटांची छपाई केली. देहूरोड पोलिसांनी याप्रकरणात चलनातील बनावट नोटा, छपाई मशिनसह कागद असा एकूण पाच लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. बनावट नोटा छापण्यासाठी शाई कोठून आणली, याचाही शोध पोलिस घेत आहेत. हिंजवडी आयटी पार्क परिसरात घरातच भारतीय चलनातील नोटा छपाईचा प्रकार समोर आला होता. हिंजवडी पोलिसांनी १६ फेब्रुवारी रोजी कारवाई करून बनावट नोटा जप्त केल्या होत्या. तसेच अल्पवयीन मुलासह तिघांवर गुन्हा दाखल केला. यात दोघांना अटक केली. त्यापाठोपाठ किवळे येथे बनावट नोटांप्रकरणी देहूरोड पोलिसांनी कारवाई केली. पिंपरी–चिंचवड पोलिसांनी एकाच महिन्यात बनावट नोटा छापणारे दुसरे रॅकेट गजाआड केले.

## महासंस्कृती महोत्सवात लोकप्रिय कार्यक्रम होणार

**बीड । प्रतिनिधी**

महासंस्कृती महोत्सवाच्या चौथ्या दिवशी 'महाराष्ट्राची हास्ययात्रा' हा लोकप्रिय कार्यक्रम महाराष्ट्रातील नामवंत हास्य कलाकार सादर करतील. पर्यटन सांस्कृतिक कार्य विभाग, ग्रामविकास विभाग ग्रामविकास विभाग कृषी विभाग आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने महासंस्कृती महोत्सव विभागीय सरस व कृषी महोत्सव २४ तारखेपासून जिल्ह्यात सुरू आहे. या अंतर्गत उद्या मंगळवारी महासंस्कृती महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी पाच ते साडेसात या वेळेत स्थानिक लोककलावंतांचा कार्यक्रम सादर करण्यात येईल तर साडेसात ते दहा या वेळेत 'महाराष्ट्रची हास्य यात्रा' हा नामवंत हास्य कलाकारांचा कार्यक्रम सादर होईल. हा कार्यक्रम सुप्रसिद्ध हास्य कलाकार प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, वनिता खरात , शिवाजी परब, पृथ्वीक प्रताप, प्रभाकर मोरे, दत्तू मोरे, स्वप्निल गोडबोले, श्वेता दांडेराव, आणि अमीर हाडकर सादर करतील. तरीबीडकरांनी महासंस्कृती महोत्सवाअंतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले आहे.

## रोजगार मिळणार –मंत्री गडकरी

नागपूर: कृषिआधारित व्यवस्था विकसित करण्यावर फोकस करणे आणि विदर्भातील शेतकऱ्यांची प्रगती कशी होईल, या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी येथे केले. मिहान येथे 'क्लिक टू क्लाऊड टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस'च्या कार्यालयाचे भूमिपूजन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. मिहानमध्ये लवकरच १ लाख तरुणांना रोजगार मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने काम व्हावे. त्यासोबतच कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास साधण्यासाठी प्रयत्न व्हावे, असे मत गडकरी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला मिहान सेझचे विकास आयुक्त व्ही. श्रमन, आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री, क्लिक टू क्लाउड संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत मिश्रा, कुसुमलता मिश्रा उपस्थित होते. गडकरी यांनी क्लिक टू क्लाउड कंपनीद्वारे विकसित 'अॅग्रिपायलट' या प्रकल्पाचे सादरीकरण बघितले. आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेतीचे उत्पादन वाढविण्यास फायदेशीर ठरणारा हा प्रकल्प आहे. कंपनीद्वारे कॉम्पॅक्ट सॉइल डॉक्टरची निर्मिती करण्यात आली असून शेतकजयांना काही मिनिटांमध्ये मृदा परीक्षण करून मिळेल. गडकरी यांनी यासंदर्भात माहिती घेतली व प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या. कंपनी २०० ते ३०० जणांना रोजगार देणार आहे. संचालन सन २०२२५ पासून नवीन इमारतीत सुरू होईल. कंपनीने २०२९ मध्ये १.२ एकर जमीन घेतली होती.

# धारावी क्रीडा संकुलाचे खाजगी क्लब कसे झाले? काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड

**मुंबई । वृत्तसेवा**

गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील युवा खेळाडूंच्या प्रतिभेला चालना देण्यासाठी, त्यांचे स्वप्न साकारण्यासाठी एकनाथ गायकवाड यांच्या संकल्पनेतून धारावीत उभारलेल्या भारतरत्न राजीव गांधी सार्वजनिक जिल्हा क्रीडा संकुलाचे रूपांतर खाजगी क्लबमध्ये करण्याचा डाव भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षाने रचला आहे. ज्या क्रीडा संकुलातून राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार झाले, तेथे आता दारुचा बार सुरु करण्याचा प्रयत्न होत आहे, तो खपवून घेतला जाणार नाही. धारावीकरांच्या हक्काच्या क्रीडा संकुलाच्या खासगीकरणाची खेळी थांबवा अन्यथा रस्त्यावर उतरु असा इशारा, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष व धारावीच्या आमदार वर्षा गायकवाड यांनी दिला आहे. एकनाथ गायकवाड यांच्या पुढाकारातुन काँग्रेसने २०१३ मध्ये धारावीत जागतिक दर्जाचे भारतरत्न राजीव गांधी सार्वजनिक



जिल्हा क्रीडा संकुल उभारून गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील युवा खेळाडूंना त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. या तीन मजली इमारतीत इनडोअर गेम्स, व्यायामशाळा, बहुउद्देशीय सभागृह, २०० मीटरचा रनिंग ट्रॅक, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल कोर्ट, बॅडमिंटन कोर्ट, लॉन टेनिस कोर्ट, कब्बडी ग्राउंड, बॉक्सिंग रिंग, जलतरण तलाव सारख्या सर्व क्रीडा सुविधा आहेत. या क्रीडा संकुलातून राष्ट्रीय खेळाडू तयार झाले आहेत, जवळपास २००० ते २५०० खेळाडू याचा लाभ घेत होते. स्थानिकांचा प्रखर विरोध आणि राज्य क्रीडा विभागाचा विरोध असतानाही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने तो डावलून २०१९ साली हे क्रीडा संकुल देखभालीच्या नावाखाली आपल्या विकासक मित्राच्या घशात घातले, असा आरोप वर्षा गायकवाड यांनी केला. क्रीडा संकुल खाजगी विकासकाच्या हाती गेल्यानंतर इथले दर सर्वसामान्यांच्या मुलांना परवडणारे राहिले नाहीत. जलतरण तलावाचे वर्षाचे शुल्क २८ हजार रुपये आहे, टेनिस, बास्केटबॉलसाठी तासाला १५०० रुपये, बॅडमिंटनसाठी तासाला २१०० रुपये मोजावे लागतात. गोरगरिब व सामान्य कुटुंबातील मुलांचे खेळाडू बनण्याचे स्वप्न उध्वस्त करण्याचे पाप भाजपाने केले आहे. गोरगरिबांच्या क्रीडा संकुलाचा खाजगी क्लब करुन हा प्रकार थांबलेला नाही. आता सत्ताधाऱ्यांच्या मदतीने इथे दारूचे अड्डे सुरू करण्याचा घाट घातला जात आहे. हा प्रकार कदापि सहन केला जाणार नाही, याविरोधात एकजुटीने लढू, असेही वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहिर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष तसेच मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे माजी सदस्य राजकिशोर मोदी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्रीमा.ना. धनंजय मुंडे यांच्या शिफारशी नुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या मान्यतेनुसार व सूचनेनुसार प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश कार्यालयात राजकिशोर मोदी यांना त्यांचे नियुक्ती पत्र देण्यात आले. अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी




२१आक्टोबर २०२१ रोजी आपल्या शेकडो सहकाऱ्यांसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला होता. साधारणतः सव्वा दोन वर्षांपूर्वी राजकिशोर मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून ते पक्षाचा एक कार्यकर्ता म्हणून काम करत आहेत. या काळात राजकिशोर मोदी यांनी उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कृषिमंत्री धनंजय मुंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर तसेच ग्रामीण भागात सचोटीने पक्षवाढीसाठी प्रयत्न केले. अंबाजोगाई शहर व परिसरात राष्ट्रवादी आपल्या दारी हा अभिनव उपक्रम राबवून राजकिशोर मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारधारा प्रत्येकाच्या घराघरात पोचविण्याचे काम केले. त्यांनी अनेक नवीन कार्यकर्ते पक्षात आणून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार तळागाळातील नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी कार्य केले आहे. राजकिशोर मोदी यांनी मागील दोन अडीच वर्षांमध्ये कुठल्याही पदाची अपेक्षा न बाळगता अजितदादा पवार व धनंजय मुंडे यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्या याच पक्षनिष्ठेची पावतीच म्हणून की काय त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मोदी यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नियुक्त केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल केवळ अंबाजोगाई शहरातुनच किंवा बीड जिल्ह्यातुनच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील राजकिय , सामाजिक, शैक्षणिक तसेच आर्थिक आणि सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या वतीने शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

## संपादकीय

# सुसंस्कृत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व

मुख्यमंत्री, लोकसभा सभापती आणि शिवसेना नेते म्हणून मनोहर जोशी यांनी मराठी माणूस, मराठी भाषा, हिंदुत्व आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी आयुष्य वेचले.



त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. सौम्य शब्दांतूनही आपण आपला विरोधातील विचार मांडू शकतो, हा त्यांचा गुणविशेष मला नेहमीच शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांच्याशी सुमारे ३५ वर्षांपासून माझे स्नेहबंध होते. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, त्याआधीपासून माझा त्यांच्याशी परिचय होता. त्यानंतर ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. लोकसभेचे अध्यक्ष, शिवसेनेचे नेते म्हणून सातत्याने त्यांचे मार्गदर्शन मला लाभले. जोशी हे अत्यंत अभ्यासू, सुसंस्कृत आणि चतुरस्र व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्यातील समयसूचकता विशेष उल्लेखनीय होती. मुख्यमंत्री असतानाच्या काळात प्रशासनावर त्यांची पकड होती. हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे एक अनुयायी, एक सैनिक या नात्याने त्यांनी हळूहळू राजकारणामध्ये प्रमुख पदाची भूमिका घेतली होती. शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात त्यांची नोंद राहील. शिवसेना आणि भाजप युतीदरम्यान काही प्रश्न निर्माण झाले, तर ते सोडवण्यावरही त्यांचा भर असायचा. २०१४ मध्ये भाजप आणि शिवसेना युती होण्यासंदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते, तेव्हा ते मला म्हणाले होते की, माझ्याकडे चर्चेची जबाबदारी द्या, मी पाच मिनिटांमध्ये युती करून दाखवतो. राजकारणातील आणि पक्षातील, युतीतील इतक्या वर्षांच्या अनुभवांमधून, निरीक्षणांमधून कुणाचे स्वभाव कसे आहेत, याची त्यांना पूर्णतः जाण होती. महिला आधार केंद्राच्या अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांची उपस्थिती राहिली. त्यावेळी महिलांच्या प्रश्नांसंदर्भात मी करत असलेल्या कार्याबाबत त्यांचे मार्गदर्शनही मला लाभले. जोशी यांची एक गोष्ट मला आवर्जून सांगावीशी वाटते, ती म्हणजे २००२ ते २००४ या काळात ते लोकसभेचे अध्यक्ष होते, तेव्हा पुण्यातील टिळक स्मारक मंदिरामध्ये झालेल्या कार्यक्रमादरम्यान त्यांनी आज ना उद्या महिलांना आरक्षण मिळेल, अशी इच्छा व्यक्त केली होती. इतकेच नव्हे, तर त्यांच्या अधिपत्याखाली विधानसभा आणि लोकसभेमध्ये महिलांना एक तृतीयांश आरक्षणाचा ठराव एकमताने मंजूर झाला होता. श्रद्धा आणि सबुरी ही जोशी यांची दोन तत्त्वे होती. यापैकी सबुरी ठेवणे हा मूलमंत्र त्यांनी आयुष्यभर जपला. गेल्या काही वर्षांत म्हणजे शिवसेनाप्रमुखांच्या निधनानंतर त्यांची प्रकृती फारशी चांगली नव्हती. तरीही शिवसेनेच्या कार्यक्रमांवर त्यांचे चाणाक्ष लक्ष होते. १९९६ मध्ये स्थापन झालेल्या कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कृषी अर्थकारणाला, सिंचनाला आणि पर्यायाने समाजकारणाला मिळालेला आधार कदापि विसरता येणार नाही. महिला आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून मला त्यांचे सहकार्य लाभले. विधान परिषद आमदारकीच्या वेळीही त्यांचे आशीर्वाद मला लाभले. तसेच, विधानसभा अध्यक्ष बनल्यानंतरच्या काळातही त्यांचे सातत्याने मार्गदर्शन मला लाभले. राजकारण असो, समाजकारण असो वा कोणतेही क्षेत्र असो, त्या क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांच्या जाण्यानंतर एक प्रमुख प्रश्न पडतो की, आपण या व्यक्तिमत्त्वांच्या सहवासातून काय शिकलो? या परिप्रेक्ष्यातून जोशी यांच्याबाबत सांगायचे झाल्यास सौम्य शब्दांतूनही आपण आपला विरोधातील विचार मांडू शकतो, हा एक महत्त्वाचा गुणविशेष मला शिकता आला. सातत्याने शिवराळ भाषा वापरणे, एकमेकांवर चिखलफेक करणे यापासून ते नेहमीच दूर राहिले. त्यामुळेच आजही आम्हाला ते आदर्श वाटतात. त्यांना आदरांजली वाहताना आम्हा सर्वांचा एक हक्काचा मार्गदर्शक हरपल्याचे दुःख मनात आहे. जोशी यांच्या निधनाने सुसंस्कृत नेत्याला महाराष्ट्र आणि देश मुकला आहे.

## डॉ.आंबेडकर विद्यालयामध्ये शालेय परिसर स्वच्छ

बीड – येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी ए हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी राष्ट्रसंत गाडगे महाराज स्वच्छता अभियान अंतर्गत मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय परिसर स्वच्छ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या अभिवादन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संतोष मेश्राम, विजय देशमुख यु.बी. पवळ यांनी व्यापक आणि व्यासंगी विचार प्रतिपादन केले.

# कायद्याची अंमलबजावणीसाठी राज्यातील बाजार समित्या बंद

**मुंबई । वृत्तसेवा**

माथाडी कायद्याची राज्यभरात काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, तसेच बाजार समितीचे केंद्रीकरण करणारे २०१८ चे विधेयक (राष्ट्रीय दर्जा बाजार समिती बनविणे) मागे घेण्यात यावे, या मागणीसाठी कामगार संघटनांकडून राज्यातील सर्व बाजार समित्यांमधील आज सोमवारी कामकाज बंद ठेवण्यात आले आहे. राज्य शासनाने कृषी उत्पन्न पणन अधिनियम विधेयकात सुधारणा प्रस्तावित केल्याने बाजार समितीसह समितीतील सर्वच घटकांचे अस्तित्व संपुष्टात येणार आहे. बाजार समित्यांवर प्रशासक बसवण्याचा घाट सुरू असल्याचा स्वाभिमानीसह शेतकरी संघटनांनी आरोप केला आहे. आज राज्यातील बाजार समित्या बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत नाशिक जिल्ह्यातील लासलगावसह १५ बाजार समित्यांमध्ये आज शुकशुकाट पाहायला मिळत आहे. जिल्ह्यातील बाजार समित्यांमधील १५ ते २० कोटी रुपयांची उलाढाल आजच्या बंदमुळे ठप्प झाली आहे. तसेच पुण्यातील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील कामगार संघटना बंदमध्ये सहभागी झाल्या आहेत. आज सकाळपासून यार्डातील कामकाज बंद ठेवण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीस पाठवू नये, असे आवाहन देखील बाजार समिती कडून करण्यात आले आहे. पुण्यातील मार्केट यार्ड आज सकाळपासूनच बंद असल्यामुळे या ठिकाणी शुकशुकाट पाहायला मिळतोय. नागपूर कळमना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील बाजारपेठा आज बंद राहतील. समितीच्या सभापतींनी काही बाजारपेठा आणि जिल्हा उपनिबंधकांना पत्र पाठवून संपाची माहिती दिली आहे. या दिवशी बाजार समितीचे सर्व प्रकारच्या शेती मालाचे लिलाव बंद ठेवण्यात येणार आहे. लाक्षणिक संपाला पाठिंबा देत धान्य बाजाराने सोमवारी बाजारपेठ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सीमांकित बाजार आवार, राष्ट्रीय बाजारतळ, उपबाजारतळ निर्माण करणे, तसेच आडते, हमाल-मापारी आदी घटकांविरोधात राज्य शासनाने पणन कायद्यात दुरूस्तीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील बाजार समित्या बंद पडून हमाल-मापारी, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकत, असे बाजारसमित्यांचे म्हणणे आहे.

## लोकसभेच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये ठाकरे गटात फेरबदल

**नाशिक । वृत्तसेवा**

लोकसभेच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी सुरु आहे. सध्या महायुती तसेच महाविकास आघाडीत जागा वाटपावरून वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरु आहे. आता लोकसभेच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये ठाकरे गटाकडून मोठी खेळी खेळली गेली आहे. नाशिकमध्ये ठाकरे गटात मोठे फेरबदल करण्यात आले आहे. जिल्हा प्रमुख विजय करंजकर यांची लोकसभा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर जिल्हा प्रमुखपदी तत्कालीन महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांची वर्णी लागली आहे. तर महानगरप्रमुखपदी विलास शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विजय करंजकर यांच्याकडे लोकसभा संघटक पद दिल्यामुळे लोकसभाची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. विजय करंजकरांनी तरुण वयात शिवसेनेत प्रवेश केला. लहान कार्यकर्ता ते जिल्हाप्रमुख हा मोठा प्रवास त्यांनी केलेला आहे. नाशिकला दोन वेळा शिवसेनेचा खासदार निवडून देण्यातही करंजकरांचा मोठा वाटा मानला जातो. विजय करंजकर यांचे नाव गेल्या लोकसभा निवडणुकीत उमेदवारीच्या शर्यतीत होते. परंतु खासदार हेमंत गोडसे यांना पुन्हा संधी मिळाल्याने करंजकरांचे नाव मागे पडले. भविष्यात न्याय देण्याचं आश्वासन करंजकरांना देण्यात आलं होतं. आता ठाकरे गटाकडून विजय करंजकर यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नाशिक महापालिकेत ठेकेदारपासून ते शिवसेना ठाकरे गटाचे नाशिक महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांचा राजकीय क्षेत्रातील प्रवास विलक्षण राहिला आहे. शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांचे कट्टर समर्थक म्हणून ते ओळखले जातात. शिवसेना पक्षासह महानगरपालिकेत अनेक महत्त्वाच्या पदांवर संधी मिळाली आहे. आता त्यांची ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना शिंदे गटाचे खासदार हेमंत गोडस रावसाहेब दानवे यांना भेटण्यासाठी आले होते. दानवे यांनी माध्यमांशी संवाद साधल्यानंतर खासदार हेमंत गोडसे यांनी दानवेंचे स्वागत केले. त्यानंतर फोटो काढताना भाजपचे इच्छुक उमेदवार दिनकर पाटील यांनी माझ्या वाटेत येऊ नका, असा खोचक टोला विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांना लगावला आणि आपल्या समोरून बाजूला काढले.

## मराठवाड्यात काँग्रेसला आणखी एक खिंडार

**मुंबई । वृत्तसेवा**

मराठवाड्यात पक्षाला आणखी एक खिंडार पडणार आहे. काँग्रेसचे निष्ठावंत अशी ओळख असलेले माजी मंत्री आणि काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष बसवराज पाटील यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. बसवराज पाटील यांनी सोमवारी आपल्या काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला. ते येत्या दोन दिवसांमध्ये भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे लातूरमध्ये काँग्रेस पक्ष खिळखिळा होणार आहे. आगामी निवडणुकीच्यादृष्टीने हा काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे. बसवराज पाटील हे लिंगायत समाजाचे नेते आहेत. ते मूळचे उस्मानाबाद तालुक्यातील उमरग्याच्या मुरूमचे रहिवासी आहेत. राजकीय वर्तुळात बसवराज पाटील हे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकुरकर यांचे मानसपुत्र म्हणून ओळखले जातात.

## विधीमंडळात ८ हजार ६०९ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास आजपासून प्रारंभ झाला आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ८ हजार ६०९ कोटी १७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधीमंडळात सादर केल्या. यापैकी ५ हजार ६६५ कोटी ४८ लाख रुपयांच्या मागण्या अनिवार्य आहेत. २ हजार ९४३ कोटी ६९ लाख रुपयांच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत, तसेच १७ हजार रुपयांच्या मागण्या केंद्रपुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने पुरवणी मागण्यांमध्ये सादर केल्या आहेत. सादर झालेल्या ८ हजार ६०९ कोटी १७ लाख रुपयांच्या स्थूल पुरवणी मागण्या असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष निव्वळ भार हा ६ हजार ५९१ कोटी ४५ लाख रुपयांचा आहे.

अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वारे यामुळे बाधित शेतीपीके / फळपिकांच्या नुकसानीकरीता २२१०.३० कोटी रूपयांची तरतूद महावितरण कंपनीच्या कृषिपंप,यंत्रमाग व वस्त्रोद्योग ग्राहकांना शासनाकडून अनुदान २०३१.१५ कोटी राष्ट्रीय आवास बँकेकडून नागरी पायाभूत विकास निधी (णखऊऋ) अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्ज २०१९.२८ कोटी मुंबई मेट्रो लाईन ३, नागपूर मेट्रो लाईन व पुणे मेट्रो लाईन यांच्या कर्जाच्या थकबाकीची परतफेड १४३८.७८ कोटी न्यायिक अधिकाऱ्यांना रेड्डी आयोग शिफारशीनुसार विविध भत्यांची थकबाकी १३२८.३३ कोटी महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत सुखसोयीच्या विकासासाठी / नगर परिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी / नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य (महसूली + भांडवली) ८०० कोटी राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सवलत मुल्यांची प्रतिपूर्ती व रा.प. कर्मचाऱ्यांचे वेतन ४८५ कोटी उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्तीचे लाभ प्रदान करणे ४३२.८५ कोटी विविध पाटबंधारे विकास महामंडळांना विविध योजनांसाठी भाग भांडवली अंशदान ३८४.४१ कोटी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्थापन झालेल्या नवीन नागरी रुणालय बांधकामासाठी ३८१.०७ कोटी.

## सध्याच्या राजकारणात निष्ठेचा झाला नायनाट



**मुंबई । वृत्तसेवा**

पूर्वीच्या राजकारणाच्या तुलनेत आज आधुनिकतेकडे झुकलेल्या राजकारणात अत्यंत वेगाने मोठे आमूलाग्र बदल झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे काहीतरी कुठेतरी बिनसतंय, ही बाब पुढे आली आहे. विविध पक्षांचे कार्यकर्ते, नेते, वरिष्ठ यांच्यात अचानक झालेले बदल मतदारांना अवाक करू लागले आहेत. अशा झालेल्या बदलांमुळे राजकारण जरी झकास असले, तरी विकास फाट्यावरच राहिल्याचे चित्र मनामनात रुजत आहे. पूर्वीच्या राजकारण्यांमध्ये मोठी सहनशीलता होती. त्यामुळे विरोधात असलेल्या भाजपाला सत्तेत यायला अनेक वर्षे वाट पहावी लागली. त्या काळात भाजपला प्रचंड आत्मविश्वास असल्याने विरोधक म्हणूनही त्यांनी स्वतःचा काळ खूप गाजवला आणि आता सत्ताधारी म्हणून मान्यता मिळविण्यात यशस्वी झाला. भाजपाने घडवलेली क्रांती सर्वज्ञात असताना या पक्षात निवडणुकीपूर्वी झालेले मोठे इनकमिंगही सर्वांनी पाहिले. याच इनकमिंगमुळे अनेकांची गोची झाली. शिवसेना फोडण्यात मिळालेले यश व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेसमवेत ४० आमदार आपल्या गटात सहभागी करण्यात मिळालेले यश यामुळे भाजपाचा आत्मविश्वास दुणावला आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शरद पवार यांच्यापासून वेगळे करण्यात मिळालेले मोठे यश, त्यामुळे भाजपची ताकद प्रचंड वाढली आहे. आता भाजप चाणक्य नीतीच्या बळावर लोकसभा निवडणूक लढण्यास सज्ज झाले आहे. एकूणच राजकारणात नेत्यांची वृत्ती बदलली म्हणून कार्यकर्तेही बदलतात असाच काहीसा प्रकार पहायला मिळत आहे. सद्य:स्थितीत राजकीय प्रवाह बघितला तर आजचे राजकारण खूप बदलले असल्याचे स्पष्ट जाणवते आहे. यापूर्वी उमेदवार सायकलवरून प्रचार करीत होते. निवडणुका लढण्यासाठी लोकवर्गणी गोळा होत असे. कार्यकर्ते, नेते एकनिष्ठ असायचे, नेतेदेखील कार्यकर्त्यांच्या मागे खंबीरपणे उभे असायचे, नेते मंडळींचा त्यावेळी एक वेगळा दरारा व आदर मानला जायचा. त्यामुळे कार्यकर्ते कट्टर समर्थक बनायचे. आता या सर्व गोष्टी इतिहासजमा झाल्यात. आता नेत्यांची भूमिका वारंवार बदलत आहे. त्यामुळे कार्यकर्तेही भूमिका बदलू लागले आहेत. पूर्वी कार्यकर्ते स्वखर्चातून पेट्रोल जाळून नेत्यांचा प्रचार करायचे, आता नेत्यांना कार्यकर्तेच मिळत नाहीत म्हणून सभेला भाडेतत्त्वावर शेकडो लोक गोळा करावे लागत आहेत. पूर्वी निष्ठेने मतदान होत असे, आता धाब्यावर जेवणावळी घालूनही मते मिळत नाहीत, ही खरी राजकीय शोकांतिका आहे. पूर्वी वर्षानुवर्षे एकहाती सत्ता असायची, आता निष्ठेचा नायनाट झाल्यामुळे सकाळी नेता एका सभेला तर तोच नेता दुपारी भलत्याच सभेत हजेरी लावून नव्याने पक्षप्रवेश करीत असल्याने एकनिष्ठा वाऱ्यावर तरंगत आहे. सूडबुद्धीच्या राजकारणात प्रामाणिक कार्यकर्त्यांचा बळी जात आहे. हे आजच्या राजकारणाचे वास्तव असून, विकास भकास अन् बकवास झाल्याचे बोलले जात आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वकिलांना आपल्या सनदेची पडताळणी करून घेणे अनिवार्य

**पुणे । वृत्तसेवा**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वकिलांना आपल्या सनदेची पडताळणी करून घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. ३१ मार्चपूर्वी ही पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधी निवृत्त न्यायमूर्ती दीपक गुप्ता व अन्य सदस्यांची समिती गठित केली आहे. या समितीच्या निर्देशानुसार बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्यामार्फत सनद घेतलेल्या वकीलवर्गाच्या सनदांची पडताळणी केली जात आहे. त्यासाठी पाच वर्षांच्या आतील प्रॅक्टीस सुरू असलेल्या वकीलवर्गाला डिक्लेरेशन फॉर्म भरून शंभर रुपये शुल्क भरून त्याची पावती जोडावी लागणार आहे. ज्यांनी २०१५ ते १७ या कालावधीत सनदपडताळणी अर्ज जमा केला होता, त्यांना केवळ फॉर्म 'अ'मधील अर्ज सादर करून २०० रुपये शुल्क भरून पावती जोडावी लागणार आहे. त्यासोबतच पाच वर्षांपासून वकिली करत असल्याचा पुरावा दर्शविणारी कागदपत्रे जोडावी लागणार आहेत. त्यात न्यायालयीन प्रकरणात दाखल केलेल्या वकालतनाम्याची प्रमाणित प्रत किंवा न्यायालयीन प्रकरणाचा रोजनामा किंवा न्यायालयीन आदेशाची प्रत किंवा न्यायालयीन प्रकरणांची यादी जोडावी लागेल. ज्यांनी २०१५ पूर्वी केवळ घोषणापत्र सादर केले होते. त्यांना यावेळीही नियमित सनदपडताळणीसाठी अर्ज करावा लागेल. १९९० पूर्वीच्या सनदधारकांना पडताळणीअर्ज करण्याची आवश्यकता नाही. लॉ फर्मसोबत कार्यरत वकिलांना ज्या लॉ फर्ममध्ये ते कार्यरत आहेत, तेथील अधिकृत व्यक्तीने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे बार कौन्सिलने गठित केलेल्या लॉ फर्म समन्वय समितीच्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करायचे आहे. दस्तनोंदणी करणार्या वकिलांना गेल्या पाच वर्षांत त्यांच्या माध्यमातून झालेल्या दस्ताच्या प्रती, वृत्तपत्रातील जाहीर नोटीस जोडावी लागेल. नोटरी वकिलांनाही त्यांच्या नोटरी प्रमाणपत्राचे नूतनीकरण करावे लागणार आहे. प्रस्तावित ॲडव्होकेट प्रोटेक्शन बिलानुसार ज्या वकिलांकडे सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (सीओपी) आहे, त्यांनाच कायद्यातील तरतुदी लागू होणार आहेत. त्यामुळे सनदपडताळणी अर्ज, घोषणपत्र भरून देणे आवश्यक असून वकिलांनी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन बारामती वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. उमेश काळे, ॲड. नितीन भामे यांनी केले आहे.

### बाजार समितीचा एकदिवसीय लाक्षणिक संप

नागपूर - राज्य सरकारने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धोरणात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात निवडणुका न घेता कायमस्वरुपी प्रशासकाची नेमणूक करण्यात येणार आहे. राज्य सरकारचा हा निर्णय शेतकऱ्यांच्या अधिकारावर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा निर्णय मागे घेण्यात यावा या मागणीसाठी आज, २६ फेब्रुवारीला राज्यातील सर्व बाजार समित्यांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारला आहे. या अनुषंगाने नागपूरातील कळमना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील बाजारपेठा बंद असल्याचे चित्र आहे. यामुळे दिवसाला होणारी कोट्यावधींची उलाढाल आज ठप्प राहणार आहे. राज्याच्या पणन कायद्यात बदल करू नये, यासाठी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने राज्यातील विविध ठिकाणच्या बाजार समितीच्या आवारात आज, सोमवारी एक दिवसीय लाक्षणिक संप केला जाणार आहे. असा निर्णय राज्यातील बाजार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर उद्या, राज्यभरातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी बंदची हाक दिली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतींनी काही बाजारपेठा आणि जिल्हा उपनिबंधकांना पत्र पाठवून या संपाची माहिती देत बंदला पाठिंबा देण्याचे आवाहन केले होते. यात एक दिवस राज्यातील बाजार समितीचे सर्व प्रकारच्या शेती मालाचे लिलाव बंद ठेवून या लाक्षणिक संपाला पाठिंबा द्यावा, असे नमूद करण्यात आले होते. त्यानुसार आज सोमवारी राज्यभरातील बहुतांश बाजारपेठा बंद ठेवण्याचा निर्णय शनिवारीच घेण्यात आला आहे. बंदच्या पार्श्वभूमीवर अलीकडेच राज्यभरातील कृषी उत्पन्न बाजार समित्याचे सभापती, उपसभापती आणि सचिवांची बैठक पुण्यात पार पडली. त्यात बंदचा निर्णय घेण्यात आला.

### महिलेच्या रॅश ड्रायव्हिंगने घेतला दुचाकीस्वारांचा जीव

नागपूर - नागपूरच्या रामझुला ओहरब्रिजवर एक महिलेच्या बेजबाबदारपणामुळे दुचाकीवरील दोन तरुणांचा बळी गेला आहे. नागपूरच्या तहसील पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनिवारच्या मध्यरात्री ही घटना घडली. या घटनेत काळ्या रंगाच्या मर्सडिज मध्ये असलेल्या महिलेने अंत्यत वेगात रॅश ड्राईव्ह करत दुचकीला धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, यातील एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर एका तरुणाचा उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे. या प्रकरणी तहसील पोलीस ठाण्यात हिट अँड रन अंतर्गत गुन्हा दाखल केला. मात्र या प्रकरणातील संशयित आरोपी हे उच्चभ्रू परिवारातल्या असल्याने पोलीस हे प्रकरण दाबत असल्याचा आरोप पीडितांच्या कुटुंबीयांनी केला आहे. दरम्यान, घटनेच्या वेळी दोन्ही महिला दारू पिऊन असल्याचा दावा देखील पीडित कुटुंबाचा आहे. पोलिसांनी दोन्ही महिलांची वैद्यकीय तपासणीकडून रक्ताचे नमुने घेतले. मात्र संशयित आरोपींना अवघ्या २४ तासांच्या आत जामीन मिळाल्याने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

### अधिवेशनात विरोधकांचे आंदोलन

मुंबई - राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होत आहे. विधिमंडळ सचिवालयाने निश्चित केलेल्या कामकाजानुसार आज वर्षाच्या पुरवणी मागण्या मांडण्यात येतील. कायदा-सुव्यवस्था, आरक्षण, शेतकरी प्रश्नांवरून अधिवेशन गाजणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर आता विरोधकांचे विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन सुरु आहे. फसवणूक नको, आरक्षण द्या असे लिहिलेलं बॅनर घेऊन हे आंदोलन करण्यात येत आहे. राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरु विरोधक चांगलेच आक्रमक झालेलं पाहायला मिळत आहे.

### बाजार समिती कायदा सुधारणेला विरोध

सांगली - सुधारित बाजार समिती कायद्याला विरोध दर्शवण्यासाठी सांगलीसह जिल्ह्यातील सर्व बाजार समितीमध्ये सोमवारी बंद पाळण्यात आला. बंदमुळे सुमारे दोन कोटींची उलाढाल ठप्प झाली. बाजार समिती सुधारणा कायदा त्वरित मागे घ्यावा अशी आग्रही मागणी जिल्हाधिकार्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली. सुधारित बाजार समिती कायद्यामध्ये सध्याच्या संचालक मंडळाऐवजी प्रशासक मंडळाच्या हाती कारभार सोपविण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे बाजार समित्या डबघाईला येणार असून स्थानिक पातळीवरील व्यापारी, अडते, शेतकरी, हमाल यांची अवस्था बिकट होणार आहे. शेतकरी वर्गाचीही आर्थिक लूट होण्याचा धोका असल्याने सर्वच बाजार समित्यासह शेतकरी, व्यापारी, हमाल यांनी या प्रस्तावित कायद्याला विरोध दर्शवला आहे. प्रस्तावित कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी सांगलीसह पलूस, तासगाव, आटपाडी, विटा, इस्लामपूर आणि शिराळा येथील बाजार समितीत आज बंद पाळण्यात आला. सर्व बाजार समितींचे पदाधिकारी, शेतकरी, व्यापारी आणि हमाल संघटनांचे प्रतिनिधी यांनी सकाळी बाजार समितीसमोर येउन कायद्याला विरोध.

# मस्साजोग येथे विविध शासकीय योजनांचे भव्य महाशिबीर संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, तालुका विधी सेवा समिती केज तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद, बीड यांच्या संयुक्त विदयमाने विविध शासकीय योजनांचे भव्य महाशिबीर रविवारी मस्साजोग येथे आयोजित करण्यात आले होते. या महाशिबीरासाठी परिसरातील जवळपास २ ते ३ हजार नागरिकांची उपस्थिती होते.



महाशिबीराचे उदघाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड आनंद एल.यावलकर, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक ए.आर.बडे, अप्पर जिल्हा पोलीस अधिक्षक , चेतना तिडके, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद , संगीतादेवी पाटील, .के.डी.जाधव, जिल्हा न्यायाधीश-१ केज तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती केज, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी.सोनी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष पी.एस.राजापूरकर, तालुका विधिज्ञ संघ केजचे अध्यक्ष एम.एस.लाड यांची उपस्थिती होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड आनंद एल. यावलकर, यांनी विविध शासकिय, निमशासकिय, स्टॉल मध्ये बरयाच योजनासंबंधी, कायद्यासंबंधी, उपाययोजना संबंधी, आर टी ओ, पोलीस संबंधी, औषधोपचार संबंधी माहिती दिली जात असल्याचे सांगितले. सदर स्टॉलच्या माध्यमातून विविध शासकीय कार्यालयांनी तसेच अशासकीय संस्थांद्वारे आपल्या योजनेची माहिती असलेले मराठी भाषेतील पॉम्प्लेट / माहिती पत्रकांचे वाटप करण्यात आले. शासकीय यंत्रणा करीत असलेली कामे याबाबतची माहिती सोप्या मराठी भाषेत जनतेपर्यंत सहजरित्या मांडण्यात येत होती. यासाठी स्टॉल धारक, सर्व संबंधीत विभागांचे प्रमुख यांनी अहोरात्र अथक परिश्रम घेऊन हे काम पुर्णत्वास नेल्याचे सहज स्पष्ट होत आहे. काही योजना जसे की नुकसान भरपाई योजना, २०१४, २०१८ व २०२२ तसेच मनोधैर्य योजना यांची थेट अंमलबजावणी ते स्वतः दरमहा मनोधैर्य समितीची बैठक आयोजित करून करीत असल्याचे सांगितले. जास्तीत जास्त लोकांना उपलब्ध योजनेचा लाभ थेट लाभार्थींच्या बँक खात्यात नियमाप्रमाणे उपलब्ध करून दिला जातो. कर्तव्यपूर्ती, अनुशासन व जिवनात पुढे जाण्याचे ध्येय हे प्रत्येकाने बाळगले पाहिजे. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हा नारा देखील त्यांनी दिला. सर्व लोकांनी महाशिबीराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले. महाशिबीरामध्ये विविध शासकीय कार्यालयांचे एकूण २८ स्टॉल्सची उभारणी करण्यात आली होती. त्यापैकी २ स्टॉल ट्रॅक्टर/मशिनरी सारख्या वस्तूंचे असल्यामुळे बाहेर ठेवण्यात आले होते. महाशिबीरामध्ये मान्यवरांच्या हस्ते कूषी विभागा मार्फत लाभार्थींना ट्रॅक्टर, रोटावेटर इत्यांदी कृषीविषयक औजारांचे वाटप करण्यात आले. तसेच आरोग्य विभागामार्फत विविध आजारांची आरोग्य तपासणी मोफत करण्यात आली. पंचायत समिती केज मार्फत विविध लाभार्थींना धनादेशाचे तसेच घरकुलाच्या प्रतिकृतीचे वाटप करण्यात आले. प्रज्ञाचक्षू लाभार्थीला त्याचा लाभ प्रदान करण्यासाठी व्यासपीठावरील मान्यवर व्यासपीठाखाली आले व लाभाचे प्रदान केले. यावरून ''सर्वांसाठी न्याय'' या बोधवाक्याची प्रचिती आली. महाशिबीरामध्ये सानेगुरूजी निवासी विदयालयाच्या विदयार्थ्यांचे बालविवाह निर्मूलनाबाबतचे पथनाटय व कथाकथन सादर करण्यात आले. सदर कथाकथन अत्यंत प्रभावीपणे विदयार्थीनीने सादर केले. त्या विदयार्थिनीचे सर्व उपस्थितांनी कौतूक केले. तसेच उसतोडणी कामगारांच्या प्रश्नांबाबत कै.स्वा.सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविदयालय बीडच्या विदयार्थ्यांचे देखील उत्कृष्टपणे पथनाटयाचे सादरीकरण केले. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे, म्हणाले, बीड जिल्ह्यातील बहुतेक मंडळी कोयत्याच्या स्वरूपात मुकादम मार्फत इतर ठिकाणी उसतोडणीच्या कामासाठी जाताता. त्यावेळीस जास्त पैशाच्या लोभापोटी त्यांच्या मुलांची हेळसांड होते व त्यांना पूर्ण शिक्षण मिळत नाही. त्यांचे कायमचे नुकसान होते व त्यांची पुढील पीढी अशिक्षीत राहून पुन्हा मजुरी करते. जोपर्यंत शिक्षणाचा आधार घेऊन व शासकिय योजनांचा लाभ घेऊन ऊसतोड कामगार यांनी आपले आयुष्य बदलावे. त्यांच्यासाठी जॉबकार्ड अंतर्गत नोंदणी करून त्यांनी त्याचा लाभ घ्यावा असे ते यावेळी म्हणाल्या. रेशिम उद्योग, बचतगट, गृहउद्योग याबाबत सवलतींचा लाभ घ्यावा असे त्यांनी सांगितले. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हा नारा देखील त्यांनी दिला. अप्पर पोलीस अधिक्षक, अंबाजोगाई चेतना तिडके, यांनी आपल्या भाषणात सायबर गुन्ह्यांपासुन कसे रक्षण करावे याबाबत माहिती दिली. आपल्या संदर्भात ब्लॅकमेलिंगचे, व्हिडीओ रेकॉर्ड करून फसवणूकीचे व रक्कम मागणीचे गुन्हे घडल्यास न लाजता त्याची माहिती थेट पोलीस ठाण्यात येऊन द्यावी असे त्यांनी आवाहन केले. जी. जी. सोनी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी आयोजित महाशिबिराचे उद्देश्य असे सांगितले की, एका छताखाली आपल्याला संपूर्ण विभागांची माहिती उपलब्ध करून देणे. अशा प्रकारच्या शिबिरांची गरज काय असा प्रश्न सर्वसामान्य माणसांच्या मनात येऊ शकतो. शासन आपल्या दारी तसेच न्याय सर्वांसाठी या ब्रिद वाक्यांतर्गत सर्व व्यवस्था काम करीत असते. बरीच माहिती पोर्टल वर इंटरनेट चा वापर करून किंवा यु ट्यूब किंवा तत्सम साधनांचा उपयोग करून घेता येते. परंतु शासनाच्या बरयाच योजना एकाठिकाणी जर जनतेला कळत असतील की ज्यांच्याकडे गरिबीमुळे ते साधनेही उपलब्ध नाहीत अशांसाठी आम्ही स्वतः आमचे कार्यालय सोडून आपल्या सर्वांसाठी आज मस्साजोग सारख्या ग्रामीण भागात हे कार्यक्रम आयोजित केले आहे. महाशिबीराचे समारोप प्रसंगी आभार प्रदर्शन के.डी.जाधव, जिल्हा न्यायाधीश-१ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती केज यांनी केले. सदर महाशिबीराच्या माध्यमातून विविध कार्यालयाच्या विविध योजने अंतर्गत मान्यवरांच्या हस्ते प्रात्यक्षिक स्वरूपात ४० लाभार्थांना लाभाचे वाटप करण्यात आले. पोलीस मुख्यालय बीड येथील पोलिस बॅन्ड पथकाच्या राष्ट्रगीताने महाशिबीराची सांगता झाली. सदर महाशिबीरासाठी मस्साजोग व परिसरातील जवळपास २ ते ३ हजार ग्रामस्थांनी दिवसभरामध्ये विविध विभागाच्या स्टॉल्सला भेट देवून विविध योजनांची माहिती घेतली.

## मुदत संपलेल्या खडी क्रेशरची वीज खंडित करा

बीड - बीड जिल्ह्यातील परवाना मुदत संपलेल्या स्टोन क्रेशरची वीज खंडित करण्याचे जिल्हाधिकारी बीड यांनी आदेश देऊन १८ दिवस उलटूनही महावितरण कडुन वीजपुरवठा खंडित करण्यात आलेला नाही त्यामुळे महावितरणने जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे दिसून येत असुन बीड जिल्ह्यातील हिरव्या डोंगररांगा गौण खनिज अधिकारी आणि स्टोन क्रेशर धारकांच्या संगनमतानेच बेसुमार गौण खनिज उत्खनन करून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवल्या प्रकरणी ईटीएस मोजणी करून संबंधित स्टोन क्रेशर धारक यांच्यावर प्रशासकीय आणि दंडात्मक कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२६. वार सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी जिल्हाधिका-यांच्या आदेशाला केराची टोपली आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री, प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख,राहुल नागरगोजे...आदि सहभागी होते. बीड जिल्ह्यातील ६६ दगडखाणीतुन बेसुमार गौण खनिज उत्खनन केले जाते.त्यातील ५३ खाणींचा परवाना १-२ वर्षांपासून संपलेला आहे.१ ते २ हजार रायल्टी भरून बीड शहरालगत इमामपुर रोड,पांगरी रोड,नाळवंडी नाका,नगर रोड येथे ५-५ एकर खदानी खोदलेल्या आहेत.जिल्ह्यात ३१ स्टोन क्रेशर असुन त्यातील १२ स्टोन क्रेशरची मुदत संपलेली आहे.परवाना नसतानाही २४ तास हे स्टोन क्रेशर सुरू असुन या अनाधिकृत स्टोन क्रेशरला महावितरण कडुन वीजपुरवठा सुरू आहे. जिल्हाधिकारी बीड यांनी दि.०७ फेब्रुवारी रोजी अधिक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय बीड यांना अनाधिकृत व मुदतबाह्य स्टोन क्रेशर यांचा वीज पुरवठा तात्काळ बंद करण्याचे आदेश देऊन आज १८ वा दिवस असुन अजुनही वीजपुरवठा खंडित करण्यात आला नाही

## समाज भवनाचे लोकार्पण

आष्टी - संत रोहिदास महाराज यांनी आपले जीवन जगत असताना कविताच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे महान कार्य केले असल्याचे प्रतिपादन युवानेते धस यांनी केले. ते आष्टी तालुक्यातील कडा येथील चर्मकार समाज बांधवासाठी आ. सुरेश धस याच्या आमदार फंडातून उभारलेल्या समाज भवनाच्या लोकार्पण सोहळ्याच्या उद्धाटना प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना सागर धस म्हणाले की, आमदार सुरेश आण्णा धस यांनी प्रत्येक समाजासाठी तालुक्यामध्ये सामाजिक सभागृह दिले आहेत. कडा येथे हे आता संत रोहिदास यांच्या नावाने सभागृह देऊन सामाजिक समतोल ठेवण्याचे काम केले आहे. आमदार धस यांनी समाजातील छोट्या मोठ्या घटकांना नेहमीच न्याय देण्याचे प्रामाणिकपणे काम केले आहे. त्याचप्रमाणे आता चर्मकार समाजासाठी कड्यांमध्ये अत्याधुनिक असे सामाजिक सभागृह बांधल्याने या ठिकाणी समाजासाठी विविध कार्यक्रम घेता येणार आहेत. याचा उपयोग करण्याचे आवाहन धस यांनी केले.

## भगवानबाबा प्रतिष्ठानवर काल्याचे कीर्तन

बीड - येथील बार्शी रोडवर असलेल्या श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर सुरू असलेल्या सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मंगळवार दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १.०० दरम्यान ह.भ.प. शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. साप्ताहातील कार्यक्रमास भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. मंगळवार दि.२७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. शास्त्री महाराज, भगवानबाबा संस्थान, तागडगाव यांचे काल्याचे कीर्तन ११.०० ते १.०० वेळात होणार आहे. त्यानंतर निमंत्रित मान्यवरांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. किर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आवाहन संत भगवानबाबा प्रतिष्ठानच्या सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना जिजामाता पुरस्कार जाहीर

**आष्टी प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. शुक्रवारी राज्य शासनाने २०२० ते २०२२ या तीन वर्षातील पुरस्कार जाहीर करण्यात आले. यामध्ये आष्टी तालुक्यातील बाबासाहेब नानाभाऊ पिसोरे यांना कृषी क्षेत्रातील सर्वोच्च असा डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार २०२१ व श्रीमती विजया गंगाधर घुले, रा.केळसांगवी यांना जिजामाता कृषिभूषण शेतकरी २०२१ या शेतकऱ्यांना कृषी पुरस्कार मिळाला आहे.तसेच आष्टी तालुक्याचे तत्कालीन तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.यामुळे आष्टी



तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. कृषी विभागामार्फत देण्यात येणारे २०२०, २०२१ आणि २०२२ करिता शेतकरी आणि शेतीशी संबंधित संस्था यांचा सन्मान करणाऱ्या शासकीय पुरस्कारांची घोषणा झाली आहे. याबाबत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी माहिती दिली.पुरस्कार वितरणात २०२० पासून खंड पडला होता. कोरोना संकट हे यामागचे प्रमुख कारण होते. अखेर धनंजय मुंडे यांनी कृषिमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर २०२०, २०२१ आणि २०२१ करिताचे विभागनिहाय कृषी पुरस्कार जाहीर केले.यामध्ये आष्टी तालुक्यातील या तिनही व्यक्तींचे कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे . दौलावडगांव येथील शेतकरी बाबासाहेब पिसोरे यांनी आपल्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रयोग राबवून भरघोस उत्पादन काढून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले या कामाची दखल घेऊन त्यांना मानाचा पुरस्कार दिला आहे.तर विजया गंगाधर घुले या महिलेने आपल्या शेतात सफरचंद व ड्रॅगन फ्रुट, नाविन्यपूर्ण शेती करून दुष्काळी आष्टी तालुक्यात फळबाग फुलुन प्रगतशील शेती करत आहेत. आपल्या पतीच्या निधनानंतर खंबीर पणे उभेराहुन प्रगतशील शेती केल्याबद्दल राज्य शासनचा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

## नवगण शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी काळे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्था, राजुरी (न.) च्या नूतन कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षपदी किशोर काळे यांची तर संचालक पदी रिजवानोद्दीन रजिओद्दीन सिद्दीकी निवड करण्यात आली. नवगण शिक्षण संस्था, राजुरी (न.) च्या कार्यकारी मंडळाची पाच वर्षांच्या कालावधीकरिता निवड करण्यात आली आहे. यामध्ये किशोर काळे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून खजिनदार पदी पूजा क्षीरसागर यांची तर रिजवानोद्दीन रजिओद्दीन सिद्दीकी यांची कार्यकारी मंडळाच्या संचालक पदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. सदरील नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी बद्दल संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्षा डॉ.दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर तसेच संस्थेच्या संचालक डॉ.सारिका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने, डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.सिद्धार्थ जाधव, कर्मचारी दशरथ काकडे, लक्ष्मण चंदनशिव, एल.बी.पवार यांच्यासह कार्यकारी मंडळाचे सर्व संचालक, सभासद, सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



## महासंस्कृती महोत्सवात विविध कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर आयोजन करण्यात आले आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या विविध कला प्रकार तसेच योगा, मलखांब, कराटे आणि साहसिक चित्तथरारक सादरीकरणाने वा.... ,.क्या बात है अशी दादा उपस्थित प्रेक्षकांनी दिली. आज महासंस्कृती महोत्सवाचा दुसरा दिवस आहे. योगा, मलखांब, कराटे आणि साहसिक चित्तथरारक खेळानंतर महाराष्ट्राची लोकधारा मुंबई यांच्या ग्रुपच्या वतीने गायन, नृत्यासह अतिशय उत्कृष्ठ सादरीकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी पाटील, आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त विश्वास मुंडे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी , कर्मचारी तसेच बीडकर मोठ्या संख्येने प्रमुख उपस्थिती होते. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महासंस्कृती महोत्सवामध्येयोगा, मलखांब व इतर खेळ कार्यक्रम सादर करण्यात आला. तर महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमात विविध गीते सादर करून प्रेक्षकांची मने जिंकण्यात आली.



## पत्रकार म्हस्के यांना जिल्हास्तरीय जिजाऊ रत्न पुरस्कार जाहीर

**आष्टी। प्रतिनिधी**

सामाजिक कार्याचा वसा हाती घेऊन अविरतपणे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ता कोविड योद्धा, पत्रकार राजू म्हस्के यांना निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने जिल्हास्तरीय माँसाहेब जिजाऊ समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.स्व:कर्तुत्वाने सतत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना दरवर्षी निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.त्यामुळे विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना सदर पुरस्काराचे वितरण ०४ मार्च २०२४ रोजी माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात आ.रोहित दादा पवार, संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे,आ.प्रकाश दादा सोळंके आधी मान्यवरांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती आ. संदीप भैया क्षीरसागर,माजलगाव तालुक्याचे माजी आमदार राधाकृष्णजी होके पाटील,माजी आमदार मोहनराव काका सोळंके, निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष रुचिता रमण मलवारी आदींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सोळके,प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी जिल्हा स्तरावर उत्कृष्ट काम करणारे आणि तालुका स्तरावर आदर्श निर्माण करणाऱ्यांना जिल्हास्तरीय माँसाहेब जिजाऊरत्न पुरस्काराने सन्मानित होत आहेत.






## नागरिकांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य -खांडे

**बीड । प्रतिनिधी**

जिथे प्रशासन आणि अधिकारी वर्ग हे सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करत नाही असे हताश झालेले, अनेक समस्यांनी त्रस्त असलेले बीड जिल्ह्यातील नागरिक एकाच दरबारात आपले म्हणणे मांडत आहेत आणि त्या दरबारातून गेलेला एकच फोन तात्काळ प्रश्नाची सोडवणूक करतो त्या दरबाराचे नाव आहे शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांचा जनता दरबार ! बीड जिल्ह्यातील नागरिक आता स्वत:च म्हणू लागले आहेत की, अन्याय के साथ में कैसे जिये जाय, खांडे के दरबार में जा के ठरह जाये ! सोमवार म्हटले की बीड जिल्हा वासियांना एकाच ठिकाणाची आठवण होऊ लागली आहे ती म्हणजे शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या शिवसेना संपर्क कार्यालयातील जनता दरबाराची. सोमवार दि.२६ फेब्रुवारी रोजी जिल्हाप्रमुख खांडे यांचा या महिन्यातील चौथा जनता दरबार नागरिकांच्या गर्दीने फुलून गेला होता. शेकडो लोकांचे शेकडो प्रश्न फक्त उत्तर एकच तो कुंडलिक खांडे यांचा एक फोन. खांडेंच्या जनता दरबारात जे नागरिक अडीअडचणी,समस्या, विकास कामाबद्दलचे प्रश्न,नोकरी,बदल्या, तक्रारी घेवून येतात त्या समस्यांचा निपटारा तात्काळ होत असल्याचा अनुभव बीडकरांना येत आहे. शासकिय, प्रशासकिय अथवा कोणत्याही ठिकाणच्या समस्या सोडवण्याची जिल्हाप्रमुख खांडे यांची हातोटी वेगळेपण सिध्द करते.कायम गर्दीत



राहणार्या खांडेंचा हा जनता दरबार सध्या चर्चेचा विषय बनला आहे. जनतेकडून दाखवण्यात येणार्या विश्वासाला पुर्ण न्याय देण्याचा प्रयत्न खांडेंकडून होताना दिसत आहे.राज्य व केंद्र सरकारच्या लोकाभिमुख योजना राबवत असताना आणि जनतेपर्यंत त्या पोहचवण्यासाठीचे काम ज्या प्रशासकिय अधिकार्यांकडे असते त्यांच्याकडून न्याय मिळत नसल्याचे पाहून बीडकर खांडेंच्या दरबारात न्याय घेवूनच जाताना पहावयास मिळतात. दि.५ फेब्रुवारी २०२४ पासून खांडेंचा जनता दरबार हाऊसफुल्ल ठरत आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न हे तात्काळ सोडवण्यासाठीच आपण हा दरबार घेत असल्याचे जिल्हाप्रमुख खांडे सांगतात. राज्याचे लोकप्रिय एकनाथराव शिंदे साहेबांच्या आदेशाप्रमाणे सर्वसामान्यांची कामे यास प्रथम प्राधान्य आपण देत असल्याचे खांडे सांगतात. शासकिय, प्रशासकिय,निमशासकिय, आरोग्य, पोलीस खाते आदि सह वैयक्तीक समस्याही नागरिक घेवून खांडेंच्या दरबारात येतात आणि समस्येचा निपटारा तात्काळ झाल्याचे पाहून समाधानाने परततात. खांडेंच्या एका फोन मुळे आमची कामे जलदगतीने झाल्याच्या प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com